I J R S S I S, Vol. V, Issue (2), May-2017: 40-45 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# जागतिकीरणात ''जमीन सुधार'' संकल्पनेचे अस्तित्व : आर्थिक विश्लेशण

**प्रा. डॉ. गौतम खु. कांबळे**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर–10
मोबाईल नं. 7888002630

**सारांश :**

प्रस्तुत शोधनिबंध चार भागात विश्लेषित केला आहे. त्यापैकी भाग–1 सहकारिता आणि जागतिकीकरण, भाग–2 सामुहिक पातळीवरील **शेती** क्षेत्राची अवस्था, भाग–3, जमीन सुधार चळवळीकडील दुर्लक्ष व भाग – 4, मूल्यांकन हे आहेत. प्रस्तुत **शोध**निबंध 'जमीन सुधार' संकल्पनेवर 1991 नंतरच्या भारतातील जागतिकीरणाच्या प्रक्रियेत काय परिणाम झालेत यावर लक्ष केन्द्रीत करीत असून देशातील साधनहीन असलेल्या दलित–आदिवासी या वंचित घटकांना **विशेष**करुन त्यांच्या रोजगार व उत्पन्नावर झालेले परिणाम अधोरेखित करतो. जागतिकीरणानंतरच्या तीस **वर्षां**मध्ये या समाजगटांच्या संदर्भात सरकार व समाजाने कोणत्या योजना व कार्यक्रम आखावेत यावि ायी उपाययोजना देखील सूचविण्याचा प्रयत्न करतो. या समाजगटांची सातत्याने वाढणारी गरिबी व बेरोजगारीचे प्रमाण लक्षात घेता **विशेष**तः ग्रामीण स्तरावर 'जमीन सुधार' संकल्पना आधुनिक परिप्रेक्षात पुनरुज्जीवीत करण्याची प्रासंगिकता **स्पष्ट**करतो.

**की–वर्डस :** जागतिकीकरण, जमीन सुधार, अनुसूचित जाती–जमाती

**गृहित तत्वे :–** जागतिकीकरण **शेती** क्षेत्रामध्ये 'सुधार' करते. ग्रामीण क्षेत्रावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडतो.

---

**प्रस्तावना :–**

जागतिकीरणाची अपरिहार्यता ही विदेशी विनिमयाच्या कमतरतेतून आली असली तरी ग्रामीण व क**ष्ट**करी समाजावर त्याचे प्रतिकूल परिणाम होणार नाहीत, अशा प्रकारची शाश्वती तत्कालिन सरकारांनी दिली असल्याचे निदर्शनास येते. इतकेच नव्हे तर या समुहास या धोरणाचे असंख्य लाभ मिळणार आहेत, असा प्रचार–प्रसार सरकारी यंत्रणा, प्रसारमाध्यमे, व जागतिकीकरणाच्या समर्थकांनी मुक्तपणे दिलेले आढळते. देशातील ग्रामीण समाजाला या धोरणावर पुरेपूर जाण असल्याची शक्यता संभवत नाही व ते स्वाभाविक नाही. मात्र या समुहाचा सरकार व समाजावर विश्वास असल्याने तसेच जागृतीची सक्षमता नसल्याने त्यांच्याकडून मूल्यमापन होण्याची अपेक्षाच काही रास्त नाही. मात्र आज या अनुसूचित समूहांची गरिबी व बेरोजगारी वि**ष**यक आकडेवारी भवि यात सुचिन्ह असल्याची शाश्वती देत नाही, ही वस्तुस्थिती दृ**ष्टी**आड करता येत नाही.

**जागतिकीरण व अनुसूचित जाती–जमातींची सहकारिता :**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या वंचित साधनहीन समाजघटकांमधील शेतमजूर सीमांत व अल्पभूधारक शेतकरी शेती कसून आपला उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करतो. अशावेळी लाभार्थीचे समूह एकत्र येवून परस्पर सहकार्याने शेती करू लागले, तर त्याला ते अधिक लाभदायक होऊ शकेल. या धारणेतून जमीन सुधारांकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. परंतू याकरिता प्रारंभी जमिनीचे पुनर्वितरण व नंतर सामुदायिक किंवा सहकारी शेती असा क्रम हवा होता, त्यापूर्वी सुद्धा सहकारी तत्व या लाभार्थीमध्ये अंकुरित होऊन ते सतत जोपासले जाणे ही पूर्वावश्यक अट देखिल होती. यासाठी सरकारच्या सक्षम भूमिकेची गरज होती. मात्र या संदर्भात काय झाले ते अभ्यासण्यासाठी प्रा. डॉ. धनंजयराव गाडगीळांनी केलेल्या अध्ययनानुसार, ''सहकारी शेती, सहकारी कारखाने व सहकारी व्यापार यांची फलदायी सांगड घालून सर्व सहकारी संस्था शाश्वत पायावर उभारणे हे, ही अशक्य आहे. ब्रिटीश आमदानी असो की, स्वराज्य असो, अनिबंध व्यवहाराचे तत्वज्ञान राज्यकर्त्यांना सारखेच मानवते आणि म्हणून आमच्या सहकारी संस्था या राष्ट्रीय व्यवस्थेचा गाभा नसून पूर्वीप्रमाणे एक दिखाऊ चळवळीचे अंग आहेत असेच मानले पाहिजे.''[1] त्याचप्रमाणे मिलिंद बोकील यांच्या 2002 मधील अध्ययनानुसार, ''लहान शेतकऱ्यांना वैयक्तिक शेती तोटयाची ठरते म्हणून जो पर्याय सुचविण्यात आला होता तो संयुक्त व सामुदायिक शेतीचा होता. सर्व खातेदारांनी आपली जमीन एकत्र करायची व सामुदायिक पद्धतीने कसून उत्पन्न वाटून घ्यायचे, असा तो मार्ग होता. यात जमिनीची वैयक्तिक मालकी राहत नव्हती.''[2] अमर्त्य सेन व जीन ड्रीज यांच्या

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

1993 मधील अध्ययनानुसार, ''जमीन सुधाराच्या क्षेत्रातील सरकारी भूमिका ही सरकारच्या क्रियाशीलतेची एक स्वागतार्ह बाब मानली जाऊ शकते. वास्तविक पूर्व आशियातील आर्थिक चमत्काराला केवळ आर्थिक उदारीकरण आणि बाजारांच्या मुक्तीचा परिणाम मानणे हा स्वतःमधील विकृतीमय बौध्दिक प्रयत्नच होईल.''[3] प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यननानुसार, अनियंत्रणवादी धोरण अवलबूंन सहकारी जीवनाची वाढ करणे अशक्य आहे. कारण सहकारी संस्था शासकीय साहाय्याशिवाय खाजगी व्यापारी व उद्यमी कंपन्यांशी असलेल्या चढाओढीत कधीच टिकणार नाही व तसे साहाय्य मिळूनही अशा संमिश्र संघटनेमुळे सहकारी जीवनाचा परिपोष होत नाही.''[4] डॉ. अमर्त्य सेन व डॉ. जीन ड्रीज यांच्या अध्ययनानुसार, ''खास करुन जमीन कसणाऱ्या गरीब शतकऱ्याची शेतीवर आधारित व्यवसाय उद्योगाकडे कास असू शकत नाही, अशी त्यांच्यावर टीका केली गेली आहे व त्यामुळे त्यांना इतर कृषी उद्योगांच्या प्रक्रियेपासून लाभ मिळू शकला नाही व ते शेवटी कृषी मजूर झालेत.''[5] यावरुन हे स्पष्ट होते, की नवीन आर्थिक धोरण असलेल्या जागतिकीकरणामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील सीमांत व अल्पभूधारक तकरी या आर्थिक धोरणाच्या प्रतिकूल परिस्थितीमूळे आपल्या वैयक्तिक व सामूहिक हितांसाठी एकत्र येऊ कत नाही. तेव्हा सामूहिक पातळीवर या संबंधातील चळवळी समाजात व शेतकऱ्यातही न दिसणे स्वाभाविक आहे.

**अनुसूचित समुहांची** शेती**तील अवस्था :–**

जमीनसुधार अधिक प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी देशातील ग्रामीण क्षेत्रामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या वंचित समाजघटकांतील शेतकरी व अल्पभूधारक शेतकऱ्यांना शासकीय योजनाअंतर्गत मदत पर्याप्त प्रमाणात कालबद्धपणे व्हावयास हवी. त्याकरिता या समजाघटकामधून संघटिपणे, शासनयंत्रणेवर सामाजिक व नैतिक दबाव सतत असावा लागतो. या संदर्भात आर. व्ही. भुस्कुटे यांच्या निरीक्षणानुसार, ''भारतीय शेती आता भांडवल सधनतेकडे वाटचाल करु लागली आहे. अधिक उतपादकतेसाठी अत्यावश्यक असलेले हायब्रीड बियाणे, रासायनिक खते, महाग साधने व अत्याधुनिक तंत्र असलेली यंत्रे शेतीत आणली जात आहेत. दुसरीकडे सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उपयोगासाठी आवश्यक असणारा निधी शासनाकडून तात्काळ उपलब्ध होत नसल्यामुळे हा वर्ग अनेक समस्याशी झगडत आहे.''[6]

आर. व्ही. भुस्कुटे यांच्याच अध्ययनानुसार, ''हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे की, महाराष्ट्रातील 3 टक्के श्रीमंत शेतकऱ्यासह राहून आपण आपले भवितव्य सुरक्षित ठेवू शकत नाही हे उर्वरित बहुसंख्य गरीब शेतकऱ्यांना अद्याप कळले नाही.''[7] प्रा. धनंजयराव गाडगीळांच्या निरीक्षणानुसार ''आर्थिक दुर्बलतेमुळे छोटा शेतकरी जमिनीचाही योग्य उपयोग करु शकत नाही. करिता छोटया शेतकऱ्याने परस्पर सहकार्य घडवून आणून जमीन, इतर साधने व मनु यबळ यांचा योग्य उपयोग करण्याचे योजिले पाहिजे परंतु वर्तमानात अशी कुठलीही सामूहिक चळवळ या गटात दिसत नाहीत.''[8] सु. गो. भानशाली यांच्या अध्ययनानुसार, ''शेतकऱ्यांनी बियाणासाठी स्वामित्वधन द्यावे लागणार, वनस्पती रोग निवारक, रसायने, औषधे यावर पेटेंट स्वामित्वधन द्यावे लागणार, श्रमबाजारात विदेशी श्रमिकांना मुभा असेल, त्याच्या आधी बहुधागा करार ताबडतोब संपू टात आणावा ही मागणी पूर्ण करुन घेण्यात यश मिळवावे लागेल. हे केले नाही तर गॅट कराराचा ग्रामीण तकऱ्यांना तडाखा बसेल. परंतु याबाबत कुठेही हालचाली दिसत नाहीत.''[9] भ. ग. बापट याच्या निरीक्षणानुसार, ''मुक्त अर्थव्यवस्थेच्या चौकटीत कार्य करणारी तमालाची बाजारपेठ भारतातील बहुसंख्य दुर्बल व अशिक्षित शेतकऱ्यांना न्याय देऊ कत नाही असा अर्थशास्त्रज्ञाचा दावा आहे आणि हा वास्तवातील अनुभव आहे. असे असतानाही महाराष्ट्रातील आजतागायतच्या ासकीय धोरणाने तीमालाला योग्य भाव न मिळण्याचीची व्यवस्था निर्माण केल्यामुळे तकरी वर्ग या यंत्रणेतून नाडला गेला आहे. याविषयी फारसा असंतोष शेतकरी वर्गात दिसत नाही.''[10] यावरुन हे स्पष्ट होते की अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील लाभार्थी शेत कऱ्यांमध्ये व समाजामध्ये शासकीय धोरणाबाबत व मदत योजनेबाबत सामूहिक पातळीवर चळवळी, आंदोलने दिसत नाही.

**जमीन सुधाराकडे दुर्लक्ष :–**

जमीनसुधार ही संपूर्ण प्रक्रिया जमिनीच्या पुनर्वितरणाद्वारे ग्रामीण वंचित समाजघटकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेऊ कते. जमीन सुधाराचा हा पहिला टप्पा मानला जातो. नंतरचे टप्पे उत्तरोत्तर विकास प्रक्रिया सक्षम होत असल्याचेच निदर्शक असताना या सदंर्भात अमर्त्य सेन व जीन ड्रीज यांनी 1993 मध्ये केलेल्या अध्ययनानुसार ''जमिनीच्या पुनर्वितरणाद्वारे समाजात मालकी हक्काची

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

व्यवस्था बदलली जाऊ शकते. आपल्या जमिनीवर छोटा शेतकरी अधिक मेहनतीचे काम करेल हे गृहीतक बहुधा कार्यदक्षतेच्या आधारावर जमिनीच्या पुनर्वितरणाच्या धोरणासाठी फारच मोठा आधार होऊ शकते.''[11]

नवीन आर्थिक धोरणाची सुरुवात समजल्या जाणाऱ्या डंकेल प्रस्तावाबाबत अध्ययन करणऱ्या गी. सो. कल्याणकरांच्या अध्ययनानुसार, 'डंकेल प्रस्तावातील शेतीविषयक तरतुदी पुढीलप्रमाणे : 1) शेतीमालाच्या आयातीवरील संख्यात्मक बंधने प्रत्येक रा ट्राने रद्द करावीत आणि त्यावेळी सीमा शुल्काच्या बंधनाचा अवलंब करावा. ही बंधनेसुध्दा सन 1999 पर्यंत 36 टक्क्याने कमी करावी. 2) जिथे आज लक्षणीय शेतीमाल आयात होत नसेल अशा देशातसुध्दा हा प्रस्ताव लागू होताच त्या वस्तूच्या एकूण उपभोगाच्या किमान 3 टक्के तसेच ''1986 च्या सरासरीप्रमाणे व 1999 पर्यंत 5 टक्के आयात खुली केली पाहीजे.''[12]

वि. स. पागे यांच्या अध्ययनानुसार, ''गेल्या सात आठ वर्षात बेकारीचा प्रश्न अधिक उग्र बनला असून लाखो लोकांची श्रम करण्याची इच्छा असूनही त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. विशेषतः सध्या बोलबाला असलेल्या खुल्या स्पर्धेच्या राजनीतीमुळे मल्टीनॅशनल कंपन्यांच्या स्वागतामुळे व स्वयंचलित मोठया यंत्रामुळे बेकारीची वाढ असंख्य प्रमाणात दिसून येत आहे. यानंतरचा टप्पा ग्रामीण क्षेत्रातील कमी शिक्षण व कमी कौशल्य असलेली श्रमशक्ती व सीमांत अल्पभूधारक शेतकरी आहेत. ''[13] राष्ट्रीय श्रम आयोग 2002 च्या अहवालानुसार, ''राष्ट्रीय नमुना सर्व्हेक्षण संघटन एन. एस. एस. ओ. ने असे दर्शविले की, ग्रामीण भागात 55.8 टक्के मजूर हे स्वंयरोजगारीत 6.8 टक्के नियमित मजूरी मिळणारे व उर्वरित 37.4 टक्के नैमित्तिक मजूर म्हणून व ी 1999–2000 मध्ये काम करीत होते.''[14] आर. एस. देशपांडे यांच्या अध्ययनानुसार, ''कृषी किंवा बागायती क्षेत्रातील उत्पादनामध्ये कंपनी क्षेत्राचा (बहुरा ट्रीय निगम) प्रवेश थांबविणे जवळपास कठीण झाले आहे. दुसरीकडे आपल्याकडे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वेगाने वाढत आहे. देशातील जमीन सुधाराचे बाम्बे कूळ कायदा व कृषी जमीन कायदा 1948 अनुच्छेद 63 नुसार नियोजन करतेवेळी अशाप्रकारचे अनुमान अर्थात गृहीत धरलेले नाही. आतापर्यंतच्या जमिनीच्या कायद्यांअतर्गत गैरकृषक व्यक्ती, त्यासाठी आवश्यक असलेल्या परवानगीशिवाय जमीन विकत घेऊ शकत नाही.''[15]

सन 1990 च्या दशकानंतर जमीनसुधाराकडे अधिक दुर्लक्ष झाले आहे. देशातील बऱ्याच राज्यांमध्ये मोठया प्रमाणावर निगमी शेती आणण्यासाठी भूमी कायद्यांपासून मुक्तता करण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतला जात आहे. हा जमीन सुधारांअतर्गत अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांना जमीन मालकी देऊन समता प्रदान करणाऱ्या जमीन सुधाराच्या स्वातंत्र्यानंतरच्या ध्येयधोरणाची निश्चितपणे घसरण आहे.''[16] वंदना शिवा यांनी सुध्दा आपल्या अध्ययनातून असेच मत व्यक्त केले त्यांच्या मतानुसार, ''जागतिकीकरणाने केवळ जमीन सुधाराच्या विषयाला ग्रासले नाही तर जमीनसुधाराऐवजी जागतिक कृषी बाजारासाठी पो षक असणाऱ्या निगमी ोतीला स्थानापन्न केले. जागतिकीकरणाने लोकांमध्ये जमिनीच्या वाटपाला छेद देऊन एकत्रित शेतांचा भांडवलीकृत ोतीसाठी लाभ मिळवून दिला. जागतिकीकरणाने जमीनधारणेवरील कमाल मर्यादांचे धोरण पूर्ण होऊ दिले नाही आणि राज्यांमधून राज्यांची भव्य निगमी शेते, जी जागतिक बाजारपेठासाठी चैनीच्या वस्तूचे उत्पादन करतात, त्यांना जमीन उपलब्ध करुन दिली.''[17]

**मूल्यांकन :**

यावरुन हे स्पष्ट होते की, जागतिकीरणाची संपूर्ण संकल्पना व व्याप्तीच सीमांत व अल्पभूधारक शेतकरी व शेतमजुराच्या हिताविरुध्द जात आहे. जागतिकीरणाचा हा वेग नजिकच्या काळात अधिक वेगवान होत असेल तर या समाजगटांचे शेतीपासून व एकूणच जीवननिर्वाहापासूनची वंचितता अधिक प्रमाणात वाढेल यात संशय नाही म्हणून हे जागतिकीकरणाचे धोरण या समाजगटांना सुसहय करण्यासाठी शासकीय स्तरावर विशेष कृतिकार्यक्रम तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

**संदर्भ टिपा :–**

1) ब्रम्हो, सुलभा, संपा., ध. रा. गाडगीळ, लेखनसंग्रह खंड–2, सहकारी चळवळीचे समालोचन, गोखले अर्थशास्त्र, संस्था, पूणे, पृ. 200
2) तत्रैव, पृ. 151
3) सेन अमर्त्य व ड्रीज जीन, इंडिया इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ॲण्ड सोशल अपॉर्च्युनिटी, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, हिंदी अनुवाद शंकर बागला, जाने., 2000, राजपाल ॲण्ड सन्स, काश्मिरी गेट, दिल्ली, 1993, पृ. 48, परि. 1

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

4) ब्राम्हो, सुलभा संपा., 'ध. रा. गाडगीळ, लेखनसंग्रह खंड–2', गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे 1974, पृ. 205.

5) सेन अमर्त्य व ड्रीज जीन, हंगर ॲण्ड पब्लिक ॲक्शन, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, पब्लिकेशन, नवी दिल्ली, 1989, पृ. 173, परि. 3

6) शाह, घनशाम ॲण्ड डी. सी., संपा., लॅंड रिफॉर्म्स इन इंडिया, व्हॉल्यूम 8 'ओव्हरव्हयु ऑफ लॅंड रिफॉर्म्स इन महारा ट्रा', आर. व्ही. भुस्कुटे, सेज पब्लिकेशन्स, इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, एम 32 मार्केट, ग्रेटर कैलाश–1, न्यु दिल्ली, 2002, पृ. 123, परि. 2

7) शाह, घनशाम ॲड डी. सी., संपा., लॅंड रिफॉर्म्स इन इंडिया, व्हॉल्यूम 8 'ओव्हरव्हयू ऑफ लॅंड रिफॉर्म्स इन महारा ट्रा', आर. व्ही. भुस्कुटे, सेज पब्लिकेशन्स, इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, एम 32 मार्केट, ग्रेटर कैलाश–1, न्यु दिल्ली, 2002, पृ. 93, परि. 3 व 4

8) ब्रम्हो, सुलभा, संपा., 'ध. रा. गाडगीळ, लेखनसंग्रह खंड–2', वर्धा जिल्हयाची विकास योजना : उद्देश, स्वरुप व कार्यपध्दती, 1974, पृ. 160

9) भानुशाल, पु. गो. 'आर्थिक वार्ता गॅट करार', अर्थसवांद संपा. रविन्द्र दोशी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जाने–मार्च 1994, पृ. 361

10) दोशी रविंन्द्र, 'महारा ट्रातील कृ ी विपणन व्यवस्था', अर्थसंवाद, खंड– 13, भ. ग. बापट, संपा. संपदा, प्राध्यापक वसाहत, देवपूर, धुळे–42, 4002, (जाने–मार्च 1990), पृ. 166

11) सेन अमर्त्य व डीज जीन, इंडिया इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ॲण्ड सोशल अपॉर्च्युनिटी, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, हिंदी अनुवाद ांकर बागला, जाने., 2000, राजपाल ॲण्ड सन्स, काश्मिरी गेट, दिल्ली, 1993, पृ. 94, परि. 2

12) कल्याणकार गि. सो., 'डंकेल प्रस्ताव आणि भारत', अर्थसवांद, संपा., रविंन्द्र दोशी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जाने–मार्च 1994, पृ. 381

13) पागे, वि.स., 'नवे रा ट्रदर्शन – रोजगार हमी योजना', संपादन व संकलन लक्ष्मीकांत मा. मंत्री, वि. स. पागे, वाङ्‌मय प्रकाश समिती, मुंबई, 1998, पृ. 13

14) राष्ट्रीय श्रम आयोगाचा अहवाल 2002, 'ॲकेडेमिक फाऊंडेशन, इकॉनॉमिका–इंडिया–इन्फो सर्व्हिसेस, 4772/73/23, भरत राम रोड, 23 अंसारी रोड, दरिया गंज, न्यु दिल्ली, 2003, पृ. 26, परि. 1

15) शाह, घनशाम ॲड डी. सी., संपा., लॅंड रिफॉर्म्स इन इंडिया, व्हॉल्यूम 8 लॅंड रिफॉर्म्स इन इंडिया ॲड लॅंड रिप्लर्म्स ॲड ॲग्रेरियन स्ट्रक्चर इन महाराष्ट्र', आर. एस. देशपांडे, सेज पब्लिकेशन्स, इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, एम 32 मार्केट, ग्रेटर कैलाश–1, न्यु दिल्ली, 2002, पृ. 119

16) प्रसाद बी. के. संपा. 'इंडियाज डेव्हलपमेंट अजेंडा इश्यूज, चैलेंजेस ॲण्ड पॉलीसीज', व्हॉल्युम 2, इंस्टिटयुट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट लखनऊ ॲड अमोल पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, न्यु दिल्ली, 2005, पृ. 522.

17) शिवा, वंदना, 'पावर्टी ॲण्ड ग्लोबलायजेशन', अव्हायलेबल ऑन एच टीटीपी/न्युज, बीबीसी, को युके / ही / इंग्लिश/ स्टॉटिक / इव्हेन्टस / राईथ / 2000 / लक्चर 5 स्टीम.

*******